## <u>नियमीत दिवाणी मुकादमा क्रं.६६/२०२५ मधील नि. ५ खालील आदेश</u>

## <u>देवीलाल विरुध्द लक्ष्मण व इतर</u>

**०१.** वादीने दाव्याच्या प्रलंबीतते दरम्यान आदेश ३९ नियम १ व २ सी.पी.सी. प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रतिवादी अथवा त्यांचे मार्फत इतर कोणीही हरकत अडथळा करु नये याबाबत प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज दिला आहे.

**अर्ज कथने संक्षिप्ततेत खालीलप्रमाणे-**

**०२.** वादीच्या कथनानुसार, मौ. नागठाणा खु ता. उमरी, जि.नांदेड येथील त्यांच्या मालकी व ताब्यातील जमीन गट क्र.१०४ एकूण क्षेत्रफळ २ हे ८३ आर पैकी त्यांच्या नावे ७/१२ उताऱ्यावर असलेले क्षेत्र ४० आर, आकार ० रु ७२ पैसे ज्याच्या तुःसिमा दाव्याच्या वाद परिच्छेदामध्ये नमुद केलेले आहेत. त्याचा यापुढे 'दावा मिळकत' असा उल्लेख केला आहे.

**०३.** वादीच्या कथनानुसार, त्यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या कडुन दुय्यम निबंधक कार्यालय येथे खरेदीखत क्र.२२७/२०२१ नुसार दावा मिळकत खरेदी घेतलेली आहे व त्यानुसार त्यांचे फेरफार क्र.१५६२ नुसार दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नाव लागलेले आहे. सदरील दावा मिळकतीमध्ये वादी हे कापुस, सोयाबीन ईत्यादी पीके घेवून त्यांच्या कुटूंबाची उपजिवीका चालवित आहेत.

**०४.** प्रतिवादी यांचा दावा मिळकतीशी काहीही हक्कसंबंध व हितसंबंध नसतांना त्यांनी दिनांक १५.०६.२०२५ रोजी दावा मिळकतीमध्ये येवून वादी हे शेतामध्ये कचरा साफसुफ व पालव्या तोडत असतांना त्यांना शिवीगाळ व दमदाटी केली. तेव्हां वादी यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता प्रतिवादी यांनी त्यांना शेतामधून बाहेर काढून दिले व परत शेतात आल्यास जिवंत मारुन टाकण्याची धमकी दिली. त्यामुळे वादी यांनी उमरी पोलीस स्टेशन येथे त्याबाबत लेखी तक्रार अर्ज

करुन कळवले असता पोलीसांनी त्यांना न्यायालयात दाद मागण्याचे तोंडी सांगितले. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

**०५.** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुतच्या दाव्यामध्ये हजर राहून त्यांचे **(नि.क्र.१८)** कडे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांनी अर्ज कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार वादी यांनी त्यांना खोटे बोलून व फसवणूक करुन स्वतःच्या नावे दावा मिळकत करुन घेतलेली आहे. तसेच, त्यांनी वादी यांच्याकडून रक्कम रुपये एक लाख कर्ज म्हणून घेतलेली होती व त्यासाठी त्यांनी दावा मिळकत वादी यांच्याकडे गहाण म्हणून ठेवलेली होती. परंतु, वादी यांनी प्रतिवादी यांच्या गरीबीचा व अज्ञानाचा फायदा घेवून अतिरिक्त व्याज मागून दावा मिळकत स्वतःच्या नावे करुन घेतलेली आहे. तसेच, दावा मिळकतीवर आज देखील त्यांचाच ताबा आहे. त्यामुळे त्यांनी वादी यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**०६.** वादीतर्फे विधीज्ञ श्री. ई.एस. रामतीर्थकर यांचा व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. डी.डी. तेलेवाड यांचा युक्तीवाद ऐकला. वादीच्या वकीलांनी वादी हे दावा मिळकतीच्या कब्जे वहिवाटीमध्ये असल्याचे कागदोपत्री पुराव्यावरुन दाखवून दिल्याने वादीच्या हक्कामध्ये प्रथमदर्शनी केस असल्याचे सांगितले आहे. तसेच, वादीच्या वकीलांनी न्यायाचा तौलनीक कल हा वादीच्या हितार्थ झुकणारा असल्याचे व प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार असल्याचे सांगितले आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या वकीलांनी ते दावा मिळकतीवर काबीज असल्याने त्यांनी वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०७.** अर्ज व म्हणणे विचारात घेतले. अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. त्यांचा सारासार विचार करुन याकामी मी खालील मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यानुसार त्यांची कारणमीमांसा मी पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादीस प्रथमदर्शनी कथन आहे काय ? | होय |
| २ | न्यायाचा तौलनीक कल वादीच्या हितार्थ झुकणारा असा आहे काय ? | होय |
| ३ | ताकीद अर्ज नामंजूर केल्यास वादीचे नुकसान संभवते काय ? | होय |
| ४ | आदेश काय ? | वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**०८.** वादीतर्फे तुर्तातुर्त मनाई अर्जाचे समर्थनार्थ शपथपत्र दाखल केले आहे. तसेच वादीने दावा मिळकतीचा ७/१२ उताऱ्याची ऑनलाईन प्रत **(नि.क्र.७/१)** कडे, फेरफार क्र.१५६२ ची ऑनलाईन प्रति **(नि.क्र.७/२)** कडे व दावा मिळकतीच्या खरेदीखताची छायांकित प्रत दाखल केलेली आहे.

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ चे निरसण-</u>**

**०९.** मुद्दा क्र. १ ते ३ हे एकसंलग्न असल्याने त्यांचे मी एकत्रीत करुन विवेचन देत आहे.

**१०.** वादींच्या कथनानुसार त्यांनी दावा मिळकत ही प्रतिवादी क्र. १ यांच्याकडून खरेदीखत क्र. २२७/२०२१ अनुसार खरेदी घेतलेली आहे. यासंदर्भात, वादी यांनी सदरील खरेदीखताचे छायांकितप्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता त्यामधील चतुःसिमा व दाव्यामधील चतुःसिमा या प्रथमदर्शनी एकसारख्याच असल्याचे दिसून येत आहे. तसेच, सदरील खरेदीखताचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक २२.०४.२०२१ रोजी वादी यांना दावा मिळकत ही रक्कम रुपये चार लाख रुपयांमध्ये विक्री केल्याचे व त्यानुसार वादी यांचा दावा मिळकतीवर ताबा असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत

आहे. तसेच, **(नि.क्र.७/२)** कडील फेरफार क्र. १५६२ चे अवलोकन केले असता वादी यांचे दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर नाव लागल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे वादी हे दावा मिळकतीचे प्रथमदर्शनी मालक व कब्जेदार असल्याचे दिसून येत आहे.

**११.** प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार दावा मिळकत ही वादी यांनी त्यांच्याकडून खोटे बोलून व फसवणूक करुन स्वतःच्या नावे करुन घेतलेली आहे. तसेच, त्यांनी वादी यांच्याकडून रक्कम रुपये एक लाख कर्ज म्हणून घेतलेले होते व त्याबदल्यात दावा मिळकत ही त्यांनी गहाण म्हणून वादीकडे ठेवलेली होती. परंतु, प्रतिवादी क्र.१ व २ यांना व वादीला प्रस्तुतच्या दाव्यातील मुद्दे निघाल्यानंतर त्यावर योग्य तो पुरावा देवून त्यावर त्यांचे योग्य ते म्हणणे मांडण्याची संधी मिळणार आहे. त्याबाबत आता कोणतेही भाष्य करणे उचीत रहाणार नाही.

**१२.** उपरोक्त उल्लेख केलेल्या सर्व बाबींचा विचार करता वादी कथन करतात त्याप्रमाणे वादी हे दावा मिळकतीचे कब्जेदार असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. त्यामुळे दावा चालण्याकरीता वादींच्या हक्कात प्रथमदर्शनी कथन आहे असे दिसुन येत आहे.

**१३.** दावा मिळकत वादींच्या ताब्यात असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यामुळे सोईचा तौलनिक कल विचारात घेण्याचे झाल्यास तो वादीच्या बाजुने निश्चितच आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास वादींची जास्त गैरसोय होईल किंवा नुकसान होईल अशी परिस्थिती दिसुन येत आहे.

**१४.** उपरोक्त संपुर्ण चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्र. १ ते ३ यांचे निष्कर्ष **होकारार्थी** निष्कर्षीत करुन मुद्दा क्र. ४ अन्वये खालील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** वादीचा नि. ५ चा तुर्तातुर्त ताकीद अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

**२.** मौजे मौ. नागठाणा खु ता. उमरी, जि.नांदेड येथील वादी यांच्या मालकी व ताब्यातील जमीन गट क्र.१०४ एकूण क्षेत्रफळ २ हे ८३ आर पैकी त्यांच्या नावे ७/१२ उताऱ्यावर असलेले क्षेत्र ४० आर, आकार ० रु ७२ पैसे (ज्याचे सविस्तर वर्णन दाव्याच्या वाद परिच्छेद मध्ये दिलेले आहे.) कब्जेवहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अथवा इतरा मार्फत दाव्याचा निकाल लागेपर्यंत कोणत्याही प्रकारचा हरकत अडथळा करु नये अशी त्यांना तातपुरत्या मनाई हुकूमाची ताकिद देण्यात येते.

KULDIP SUBASHRAO KULKARNI

Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2025.10.30 11:09:58 +0530

**( के. एस. कुलकर्णी )**
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर,
उमरी.

दिनांकः- २९.१०.२०२५